दी 2306

क्र.उसं/आस्था-१/अराप/अधिक्षक/ता.अ.ज्येसु/ २०१८/
उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, ,
मंत्रालयासमोर, मुंबई-३२,
दूरध्वनी:- २२०२९०८६, फॅक्स:- २२०२६८२६
ई-मेल:- diestt@maharashtra.gov.in
दिनांक:- 13 MAR 2018

**विषय:-उद्योग संचालनालयातील राज्य पातळीवरील 'अधिक्षक' या संवर्गाची दि. १/१/२०१८ रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्याबाबत**

**परिपत्रक**

उद्योग संचालनालयातील राज्य पातळीवरील **'अधिक्षक'** या संवर्गाची दि.१/१/२०१८ रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठता सूची सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/ १२, दिनांक २१/१०/२०११ नुसार विहित प्रपत्र 'अ' मध्ये प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर ज्येष्ठता सूची मध्ये काही वास्तविक चुका अथवा त्रुटी राहिल्या असतील तर त्याबाबतची लेखी अभिवेदने संबंधित कर्मचाऱ्यांनी प्रस्तुत परिपत्रक प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या कालावधीत योग्य त्या समर्थनासह विशेष कार्य अधिकारी (आस्थापना-१) मुख्यालय, मुंबई यांना सादर करावीत. विहित मुदतीत कोणतेही आक्षेप आस्थापना शाखेस प्राप्त न झाल्यास संबंधितांचा काहीही आक्षेप नाही असे गृहीत धरुन ज्येष्ठतासूची अंतिम करण्यात येईल तसेच अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द झाल्यानंतर यात समाविष्ट असलेल्या कर्मचाऱ्यांकडून नव्याने आक्षेप प्राप्त झाल्यास असे आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

सदर **'अधिक्षक'** संवर्गाच्या तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठता सूची बाबतचे परिपत्रक संचालनालयाच्या www.di.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले आहे. तसेच सर्व कार्यालयाना ई-मेल द्वारे पाठविण्यात आले आहे. संबंधित कार्यालय प्रमुखांनी तसे संबंधितांना लेखी स्वरुपात कळवावे.

सहपत्र:- विहित प्रपत्र 'अ'

अतिरिक्त उद्योग संचालक
यांचे मान्यतेने

(वि.मु.सिरसाठ)
विशेष कार्य अधिकारी (आस्थापना-१)

प्रत रवाना:- (ई-मेल द्वारे)
१)उद्योग सह संचालक, मुं.प्रा.वि (मुंबई)/ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती विभाग
२)अधिक्षकीय उद्योग अधिकारी, उप विभागीय कार्यालय, नांदेड
३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, (सर्व)
( यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असणाऱ्या संबंधित कर्मचा-यांना सदर परिपत्रक निदर्शनास आणावे व तसे कळविल्याबाबत त्यांची स्वाक्षरी घेतलेली प्रत अभिलेखात ठेवावी.)
४)मुख्यालयातील सर्व शाखा
५) पदोन्नती/नियुक्ती कक्ष, आस्थापना शाखा, मुख्य कार्यालय

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दिनांक २१.१०.२०११ सोबतचे प्रपत्र "अ"
उद्योग संचालनालयातील राज्य पातळीवरील 'अधिक्षक' या संवर्गात दिनांक ०१/०१/२०१७ ते ३१/१२/२०१७ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची तात्पुरती अतिरिक्त (Provisional Additional) ज्येष्ठतासूची

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | ज्येष्ठता क्रमांक | नांव | प्रवर्ग (नियुक्ती नंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक) | जन्म तारीख | नियुक्ती दिनांक | नियुक्तीचा मार्ग (सरळसेवेने / मर्यादित विभागीय परिक्षेद्वारे नियुक्त उमेदवारांचा गुणवत्ता क्रमांक व परिक्षेचे वर्ष) | ज्येष्ठता दिनांक/ज्येष्ठते चा मानीव दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | ११ | श्री.र.मो.सुतार | इ.मा.व वैध | ३०/५/१९६८ | १९/८/१९८६ | पदोन्नती | १०/१०/२०१७ | ३१/५/२०२६ | एस.एस.सी | ---- |
| २ | १२ | श्री.बा.र.वाघले | खुला | ०१/०१/१९६५ | २७/४/१९८४ | पदोन्नती | १०/१०/२०१७ | ३१/१२/२०२२ | एस.एस.सी | ---- |

विशेष कार्य अधिकारी (आस्थापना-१)